ऊसाखालील 50 टक्के क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणण्यासाठी विशेष मोहिम राबवा -

मंत्रालयात कृषी व पणन विभागाचा आढावा मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला. यावेळी कृषीमंत्री एकनाथराव खडसे, सहकार मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री राम शिंदे आदी उपस्थित होते.

श्री.खडसे यावेळी म्हणाले, महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 च्या कायद्यातील प्रस्तावित बदल करताना शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण होणे गरजेचे आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यरत राहिल्या पाहिजेत यासाठी कृषी उत्पन्न बाजारपेठांचा विकास होणे आवश्यक आहे. कृषिमालाची मूल्य साखळी विकसित करताना देशातून 2014-15 मध्ये फळे, फुले, भाजीपाला यांची 11 हजार 663 कोटींची निर्यात करण्यात आली. त्यापैकी महाराष्ट्रातून 4853 कोटीची निर्यात झाली आहे. राज्यात अपेडा, एनएचएम, एनएचबी, एमओएफपीआय यांच्या विविध योजनेअंतर्गत नाशिक, सांगली, पुणे, सातारा, सोलापूर, अहमदनगर, लातूर जिल्ह्यात शीतगृह, पॅक हाऊस यांची सुविधा आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव डी.के.जैन यांनी सादरीकरण केले. बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव सुधीर श्रीवास्तव, सुनील पोरवाल, प्रधान सचिव सीताराम कुंटे, कृषी आयुक्त विकास देशमुख आदींसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.